# हिंदू कोड बील : डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे योगदान

**डॉ. भरत भीमराव जाधव** अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,कोल्हापूर . ७३८५२२१९३

bharatjadhav13@rediffmail.com

---

**प्रस्तावना**

स्त्री ही क्षणाची पत्नी तर अनंत काळाची माता असते असे मानले जाते, त्यामुळे तिचा दर्जा समाजाने दुय्यम ठरविलेला दिसतो. आजवरच्या स्त्रियांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक वाटचालीचा आढावा घेत असताना आपणास काही मुद्दे विचारात घ्यावे लागतात. वैदिक काळात स्त्रियांची स्थिती उत्कृष्ट होती. महिलांना समानतेचा अधिकार होता. पुरुष वर्गही महिलांकडे आदराने पाहत असे. धार्मिक विधींमध्ये स्त्रियांना समान स्थान होते. स्त्रियांना मालमत्तेत समान अधिकार होते. शिक्षण क्षेत्रातही महिलांना समान अधिकार होते. त्यांना शिक्षण घेण्याचा, स्वतःचे भविष्य घडवण्याचा आणि शिक्षक म्हणून काम करण्याचा अधिकार होता. वैदिक काळात समाज पुरुषप्रधान होता. महत्त्वाच्या पदांवर पुरुष असायचे. जर मुलगी वडिलांची एकुलती एक मुलगी असेल तर ती त्याच्या मालमत्तेत वाटेकरी होती. त्या काळातही स्त्रिया वयात आल्यावरच लग्न करत असत. बालविवाह अजिबात प्रचलित नव्हता. त्या काळात स्त्रियांमध्ये पुनर्विवाहाची प्रवृत्ती होती ज्यामुळे त्यांची स्थिती सुधारली. वैदिक काळात शिक्षण पद्धती खूप विकसित होती. वैदिक काळातील स्त्रियांना तत्त्वज्ञ आणि विचारवंत म्हणूनही महत्त्व प्राप्त झाले.

नंतरच्या उत्तर वैदिक काळामध्ये स्त्रियांचा दर्जा घसरायला लागला. स्त्रियांच्या सन्मानात घट झाली. समाजकंटकांनी वर्चस्व गाजवायला सुरुवात केली. या काळात समाजात बालविवाह, बहुपत्नीत्व, वेश्याव्यवसाय, देवदासी, भ्रूणहत्या, परदा प्रथा यांचा समावेश होता. नंतरच्या काळात सतीची प्रथाही समाजात रूढ झाली. मोठ्या कुटुंबांमध्ये, पुरुषाला अनेक बायका होत्या, ज्या हळूहळू लहान कुटुंबांसाठी आदर्श बनू लागल्या आणि समाजात या प्रथा वाढू लागल्या. या काळात वडिलोपार्जित मालमत्तेतील महिलांच्या हक्कांवर गदा येऊ लागली. नंतरच्या काळात स्त्रियांचे धार्मिक अधिकार मर्यादित केले गेले.

मध्ययुगीन काळात स्त्रियांच्या समाजात वेगवेगळ्या भूमिका होत्या. बायको, आई, बहीण आणि कारागीर या भूमिका महिलांनी केल्या. त्यांच्यापैकी काहींनी राण्यांप्रमाणे नेतृत्वाची भूमिकाही स्वीकारली.सुरुवातीच्या मध्ययुगीन काळात स्त्रियांना जमिनीवर महत्त्वपूर्ण अधिकार होते. मध्ययुगातील स्त्रिया प्रारंभिक युगातील स्त्रियांपेक्षा अधिक विकसित होत्या. मध्ययुगाच्या उत्तरार्धापासून स्त्रियांच्या कामावर अनेक निर्बंध लादले जाऊ लागले आणि या काळात स्त्रियांच्या मालमत्तेवरील हक्कांवरही गदा आली.

आधुनिक काळात राष्ट्रीय आणि सामाजिक जाणिवा जागृत झाल्यामुळे सद्यस्थितीत महिलांच्या स्थितीत बरीच सुधारणा झाली आहे. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असल्यामुळे माणूस म्हणून तिला तिचा हक्क मिळण्यास सुरुवात झाली आहे. त्यांना आता पुरुषांवर अवलंबून राहण्याची गरज नाही.या सर्वांचे श्रेय मध्ययुगीन संत परंपरा, छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्त्रीविषयक धोरण यांना द्यावे लागते.महात्मा फुले, महात्मा बसवेश्वर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले याचबरोबर अनेक समाजसुधारक या कार्यासाठी पुढे आले.तरीही स्त्रीचे समाजातील स्थान दुय्यम राहिले.माणूस म्हणून तिच्याकडे बघण्याची समाजाची दृष्टी आजही तेवढीशी बदलेली नाही.यास्तव हिंदू कोड बील आणि स्त्री सुधारणा याविषयी चर्चा होणे अपेक्षित आहे.

**अभ्यासविषय निवडीमागील उद्देश**

१.हिंदू धर्मातील स्त्री सुधारणाचा अभ्यास करणे.

२.हिंदू कोड बिलातील विविध घटकांची भूमिका अभ्यासणे.

३.हिंदू कोड बिलातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तुत्वाचा परिचय करून घेणे.

४.हिंदू कोड बील व राजकीय,सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या विविध पैलूंचे विवेचन करणे.

**गृहितके**

1. हिंदू कोड बील स्त्री सुधारणासाठी अतिशय महत्त्वाचे ठरले.
2. हिंदू कोड बील राजकीय,सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या विविध पैलूंवर खूप मोठा प्रभाव पडला आहे.

**संशोधनाच्या पध्दती**

हिंदू कोड बील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान या संशोधनविषयासाठी सैध्दांतिक संशोधन पध्दती,अन्वयार्थक संशोधन पध्दती,संदर्भान्वयी संशोधन पध्दती,तौलनिक,मानसशास्त्रीय अशा विविध संशोधन पध्दतींचा अवलंब केला जाणार आहे.

**हिंदू कोड बिलासाठी डॉ. आंबेडकर यांचे कार्य**

भारतात साधारणपणे दोन पद्धती प्रचलित होत्या. एक बंगाल आणि आसाममध्ये दायभाग ही पद्धती प्रचलित होती तर उर्वरित इतर भागांमध्ये 'मिताक्षर' हा पारंपरिक कायदा अस्तित्वात होता. ‘दायभाग’ हा जीमुतवाहन याने लिहिलेला ग्रंथ होता तर ‘मिताक्षर’ हा याज्ञवल्क्य स्मृतीवरील टीकाग्रंथ होता आणि त्यात पूर्वजांच्या संपत्तीच्या वाटणीसंबंधी नियम होते जे विशेष करून स्त्रियांवर अन्याय करणारे होते. हे बहुतांश नियम स्त्री पुरुष विषमतेवर आधारलेले होते. वेद, श्रुती, स्मृती हेच कायदे होते आणि त्यातून

जन्माला आली होती. असमानतेची, स्त्रियांना त्यांचे हक्क नाकारणारी आणि पुरुषांना अनिर्बंध स्वातंत्र्य देणारी व्यवस्था ही व्यवस्था होती. दायभागमध्ये एके ठिकाणी लिहिलं होतं की जी स्त्री विधवा झाली आहे किंवा जिला मूल झालेलं नाही अशा स्त्रीला पूर्वजांच्या संपत्तीत कोणत्याही प्रकारचा वाटा मिळू नये. स्त्रियांमध्ये कार्यशक्ती नसते म्हणून त्यांना संपत्तीत हिस्सा देऊ नये असेही त्यात नमूद केले होते. त्या काळात इथल्या व्यवस्थेने स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला आणि सतीची चाल. बालविवाह, विधवा विवाह प्रतिबंध अशा प्रथा निर्माण करुन स्त्रियांना संपत्तीवरील अधिकारातून हद्दपार केले. पुरुष अनेक लग्न करुन पत्नीला वाऱ्यावर सोडू शकत होता. तिच्या जगण्याची तजवीज न करता केवळ तिला कुणाच्या तरी आश्रयाने राहणं भाग पाडणारीच ही व्यवस्था होती.(अंजली कुलकर्णी, चपराक दिवाळी अंक )

दुसरं म्हणजे भारताच्या विविध भागांत हिंदुंचे विवाह, वारसा हक्क, इ. वैयक्तिक वा कौटुंबिक बाबतीत लागू होणारे पारंपरिक कायदे भिन्न भिन्न होते.ब्रिटिशांना देखील देशातील सर्व विविध जाती पोटजाती, पंथाना, सर्व चालीरीतींना एका समान कायद्याच्या कक्षेत कसे आणावे हा प्रश्न पडला होता. त्यामुळे खरंतर ब्रिटिशांच्या काळातच हिंदू कोड बिलाचा एक मसुदा तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. त्यासाठी त्यांनी सर बी एन रॉय यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताचे कायदेमंत्री झाल्यानंतर त्यांनी स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी हिंदू कोड बिल आणले.महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. पीडित- शोषित वर्गाच्या समस्यांमागची कारणे शोधून त्यांचे निराकरण करण्यासाठी खूप प्रयत्न केले. परंतु १९५१ मध्ये त्यांनी काश्मीर प्रश्न, भारताचे परराष्ट्र धोरण आणि हिंदू कोड बिल याबाबत नेहरूंच्या धोरणावरून मतभेद व्यक्त करत आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि स्वातंत्र्यानंतरच्या सुधारणांमध्येही त्यांनी योगदान दिले. भारतीय परंपरेने स्त्रीला कायमच गुलाम ठेवले आहे. तिने बालपणी पित्याच्या तरुणपणी पतीच्या आणि म्हातारपणी पुत्राच्या अधिपत्याखाली राहावे अशी व्यवस्था म्हणून मनुस्मृतीने करून ठेवली. डॉ. आंबेडकर यांनी हिंदू कोड बिल विषयी म्हंटले होते की, 'समाजातल्या वर्गावर्गातली असमानता, स्त्री पुरुष यांच्यातली असमानता, तशीच अस्पर्शीत राहू देऊन आर्थिक समस्यांशी निगडित कायदे संमत करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे आणि शेणाच्या ढिगाऱ्यावर राजमहाल बांधण्यासारखे होय. बाबासाहेबांनी अविरत कष्ट करून हिंदू कोड बिल तयार केले. स्त्रियांना कायद्याने हक्क दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे स्वप्न त्यांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून पाहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपण ओळखतो ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि दलितांचे कैवारी म्हणूनच पण त्यांचे कर्तृत्व इतपतच मर्यादित नाही. त्यांनी भारतीय स्त्रियावर अनेक उपकार करून ठेवले आहेत. भारतीय स्त्रियांच्या जीवनात क्रांतिकारी बदल आणू पाहणाऱ्या हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कार्याची म्हणावी तशी दखल आमच्या भगिनी वर्गाने घेतलेली नाही. स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून बाबासाहेबांची इच्छा होती की सर्व भगिनींना या जाचक रूढी आणि परंपरा मधून मुक्त करावे आणि ते आपले कर्तव्य आहे असे समजून त्यांनी हिंदू कोड बिल बनवायला घेतले. २४ फेब्रुवारी १९४९ रोजी ते संसदेत मांडले.

या संपूर्ण काळात आंबेडकरांनी अनेक व्याख्याने दिली ज्यात त्यांनी महिलांच्या स्वातंत्र्यासाठी विधेयकाचे महत्त्व पटवून दिले. खाजगी क्षेत्रात महिलांना समान अधिकार हा विषय आंबेडकरवादी महिला संघटनांमध्ये जोर धरत होता.ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वुमन कॉन्फरन्सने अनेक महत्त्वपूर्ण ठराव पारित केले, ज्यात बहुपत्नीत्वाला विरोध करणे आणि घटस्फोट कायदा लागू करणे यांचा समावेश होता. दुर्दैवाने महत्त्वाच्या महिला नेत्यांना विधेयकाला पाठिंबा देण्यात रस नव्हता.हिंदू कोड बिलाने मिश्र विवाह शक्य झाले आणि बहुपत्नीत्व, घटस्फोट, वारसा आणि पालकत्व यावरील उच्चवर्णीय पुरुषांची सत्ता संपवली. राज्याच्या सामाजिक आणि पितृसत्ताक वर्गाविरुद्ध महिलांच्या हक्कांसाठीच्या लोकशाही लढ्याच्या इतिहासात, डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या बाजूने केलेले युक्तिवाद अतिशय महत्त्वाचे होते.

**हिंदू कोड बिल संहिता**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रख्यात वकील होते. स्वतंत्र भारताचे कायदे मंत्री म्हणून त्यांनी हिंदू कोड बिलावर वर सुमारे ३ वर्ष काम केले. त्यांना वाटत होते की जाति व्यवस्थेमध्ये स्त्रियांना कमी लेखले जात आहे त्यासाठी हिंदू कोड बिल असे बनवले पाहिजे ज्यामुळे देशातील सर्व स्त्रियांना समान अधिकार प्राप्त होतील.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काही विशेष वर्ग किंवा विशेष जातीच्या स्त्रियांना त्याचा फायदा होईल याची चिंता नव्हती. त्यांना सर्व जाती आणि वर्गाच्या स्त्रियांच्या अधिकारांचे संरक्षण करायचे होते. देशाच्या विकासासाठी देशाच्या सर्व वर्गातील लोकांना समानतेचा अधिकार भेटला पाहिजे. स्वतंत्र भारतातले पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४८ मध्ये संविधान सभेत "हिंदू कोड बिल"चा मसुदा प्रस्तुत केला. या बिलाचे एकूण आठ अधिनियम केले होते. १. हिंदू विवाह अधिनियम २.विशेष विवाह अधिनियम ३.दत्तकग्रहण, अल्पायु - संरक्षण अधिनियम ४.हिंदू वारसाहक्क अधिनियम ५.कुटुंबातील निर्बल किंवा साधनहीन सदस्यांच्या भरणपोषणासंबंधी अधिनियम, ६. अज्ञानपालक संरक्षण संबंधित अधिनियम ७. उत्तराधिकारी संबंधी अधिनियम आणि ८. विधवांना पुनर्विवाह अधिकार अधिनियम.

या विधेयकाने हिंदू धर्मातील प्रादेशिक परंपरा आणि चालीरीतींच्या विविधतेकडे दुर्लक्ष केले.या विधेयकाने शीख, जैन आणि बौद्ध धर्माला हिंदू धर्माचा भाग मानले. यामध्ये हिंदू धर्माशी संबंधित पैलूंव्यतिरिक्त इतर अनेक गोष्टींचा समावेश आहे.(हिंदू कोड बील खंड IV हिंदू संहिता विधेयक)

या विधेयकामुळे हिंदू वैयक्तिक कायद्याबाबत अनेक वाद निर्माण झाले.या विधेयकात घटस्फोटाच्या स्वातंत्र्याचा युक्तिवाद करण्यात आला, त्याला विरोध झाला.या विधेयकाने बहुपत्नीत्वाला विरोध केला, हिंदू स्मृती आणि धर्मग्रंथांचा हवाला देऊन पाश्चात्य असल्याचा विरोधकांनी दावा केला.या विधेयकात विवाह, घटस्फोट आणि स्त्रियांसाठी समान संपत्ती अधिकार यावरील जाती-आधारित मर्यादा दूर करण्याचा प्रयत्न केला गेला, त्यालाही विरोध झाला.या विधेयकाने प्रादेशिक नियमांचे उच्चाटन करून सर्व हिंदूंसाठी मालमत्ता मालकीची संयुक्त कुटुंब व्यवस्था स्थापन केली.या विधेयकाने मृत व्यक्तीच्या मालमत्तेत त्याची विधवा, मुलगी आणि मुलगा यांना समान अधिकार दिले आहेत. याव्यतिरिक्त, मुलींना त्यांच्या वडिलांच्या मालमत्तेतील अर्धा हिस्सा त्यांच्या भावांकडून मिळेल.

या विधेयकात विवाहाशी संबंधित तरतुदी बदलण्यात आल्या. विभक्त होण्याबाबत संबंधित तरतुदी आणि हिंदू पुरुषांनी एकापेक्षा जास्त महिलांशी विवाह करण्यावर बंदी घालण्यात आली होती. हिंदू स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार दिला. विवाह नोंदणी, हरकत, पोटगी आणि घटस्फोट याविषयी डॉ। बाबासाहेब आंबेडकर यांनी खूप चांगल्या प्रकारे अभ्यास करून हिंदू कोड बिलामध्ये त्याचा समावेश केला गेला. कलम १२ नुसार विवाहाच्या सूचना देणे, कलम १४ नुसार नोंदणी अधिकारी याचा आक्षेप असल्यास त्याविषयी निराकरण करणे, विवाहाला आक्षेप घेणे, लग्न साजरे करण्याची स्थळ आणि पद्धत, विवाहाचा दाखला, विवाहातील पालकत्व, विना घटस्फोट विवाह आणि त्याबद्दलची शिक्षा, रद्द आणि रद्दबादल विवाह हे कलम २८ आणि कलम २९ नुसार त्यांनी समाविष्ट केले. घटस्फोट न घेता दुसरे लग्न करणाऱ्या लोकांना १८६० च्या ४५ व्या कलमानुसार ४९४ व ४९५ यात तरतूद केलेल्या स्पष्टीकरणाद्वारे तो गुन्ह्यास पात्र ठरला. कायदेशीर विभक्त होण्याकरता कलम ३३ ते ३८ यामध्ये त्यांनी त्याची व्याख्या ठरवली. पोटगी कशी द्यावी, निरंतरची पोटगी कशी असावी, कायदेशीररित्या अज्ञान मुलांचा ताबा, पोटगी आणि त्यांच्या शिक्षेसंबंधी ज्या आदेशाचे पालन याविषयी डॉ. आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलामध्ये महिलांसाठी विशेष तरतुदी केल्या.

अशा पद्धतीने हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करण्यात आला होता.

**हिंदू कोड बिल टीका आणि समर्थन**

तत्कालीन अध्यक्ष राजेंद्र प्रसाद म्हणाले की केवळ "उच्च शिक्षित महिलांनी" या विधेयकाचे समर्थन केले मात्र घटस्फोटाच्या कलमाला कधीही समर्थन देणार नाही.

बाबासाहेबांशी वैचारिक मतभेद असलेले आचार्य अत्रे म्हणतात, "आंबेडकरांचे हिंदू कोड बिल जर मान्य झाले असते, तर हिंदू समाजातील सर्व भेद, अन्याय आणि विषमता नष्ट होऊन हिंदू समाज हा अत्यंत तेजस्वी आणि बलशाली झाला असता आणि भारताच्या ५००० वर्षाच्या इतिहासात जी क्रांती आजपर्यंत कोणी घडवून आणली नाही ती घडून आली असती. पण दुर्दैव भारताचे दुर्भाग्य हिंदू समाजाचे देवासारखा आंबेडकरांनी पुढे केलेला हात त्यांनी झिडकारला आणि स्वतःचा घात करून घेतला."

भारतीय संविधान परिषदेने जात धर्म किंवा लिंगभेद करून मानव प्राण्यात कायदा भेदाभेद करणार नाही न्यायाच्या तराजूत सर्वांना एकाच मापात तोडले जाईल अशी घोषणा करून स्वातंत्र्य व समता या तत्त्वांचा अंगीकार केलेला होता.असे असले तरी हिंदू कोड बिलाच्या पार्श्वभूमीवर हिंदू स्त्रियांना त्यांचे न्याय हक्क देण्यास विरोध झाला हे अतिशय दुर्दैवी होते. या बीलातील घटस्फोट, द्वीभार्या या कलमांना सनातनी मनोवृत्तीच्या विरोधकांनी प्रचंड विरोध केला. या बिलाद्वारे बाबासाहेबांनी एक विवाह पद्धतीला कायदेशीर मान्यता, स्त्रियांना संपत्तीमध्ये समान वाटा आणि सर्व कायदेशीर बाबींमध्ये समान संधीची तरतूद केली होती. परंतु कडवे हिंदू नेते आणि विचारवंत यांना स्त्रियांना समान अधिकार देण्याची तयारी नव्हती. हिंदू धर्मावरील आक्रमण अशा प्रतिक्रिया देऊन अशा नेत्यांनी प्रखर विरोध केला होता. हिंदू धर्मावर भाष्य करतोय म्हणून बऱ्याच तथाकथित हिंदू समाजाने बाबासाहेबांविषयी घृणास्पद प्रतिक्रिया दिल्या होत्या. इतकेच काय बाबासाहेब आंबेडकर देशद्रोही हिंदू धर्माचा शत्रू अशा घोषणा देत मोर्चे काढले होते. बाबासाहेबांनी त्यावेळच्या असलेल्या प्रबुद्ध वर्गातील लोकांना प्रसार माध्यमांना या बिलाच्या पाठी उभे राहण्यास आवाहन केले, परंतु बाबासाहेबांच्या पाठीशी कोणीही उभे राहू शकले नाही. समाजातील समानतेचे सकारात्मक बदल करण्याची बाबासाहेबांची इच्छा मातीमोल ठरली होती. यामध्ये हिंदू पुरुषांना दोन किंवा त्यापेक्षाही अधिक स्त्रियांशी विवाह करायला प्रतिबंध आहे आणि त्यासंबंधी शिक्षेची तरतूद केली आहे. यामध्ये हिंदू स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा अधिकार देण्यात आला होता. हे बिल अशा अनेक कुप्रथांना हिंदू धर्मापासून दूर करत होते, ज्याला परंपरेच्या नावाखाली काही कट्टरतावादी सनातनी जिवंत ठेवू इच्छित होते.

दुर्दैवाने सत्र संपताना या बिलाची केवळ चार कलमेच मंजूर झाली यास्तव अत्यंत दुःखी कष्टी होऊन डॉक्टर आंबेडकरांनी २७ सप्टेंबर १९५१ रोजी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. बाबासाहेबांचे कष्ट निरर्थक ठरले नाहीत ज्या वारसा कायद्याला विरोध करण्यात आला होता तो बाजूला सारून प्रथम हिंदू विवाह कायदा हाती घेण्यात आला. हिंदू कोड बिलाचे चार वेगवेगळे भाग करून हे चारही कायदे वेगवेगळ्या वेळी नेहरूंनी मंजूर करून घेतले. १९५५ मध्ये मंजूर झालेले चार हिंदू कायदे म्हणजे हिंदू विवाह कायदा, हिंदू वारसा हक्क कायदा, हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा, हिंदू दत्तक व पोटगी कायदा हे कायदे मंजूर होणे म्हणजे कायद्याच्या इतिहासातील एक क्रांतीकारक घटना होय. या कायद्याने भारतीय स्त्रियांच्या जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडण्यास सुरुवात झाली. या कायद्याने स्त्री पुरुषांच्या दर्जात कायद्याने समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हिंदू कोड बिलाला विरोध करणाऱ्यांनी सांगितले की, संसदेचे सदस्य हे जनतेने निवडून दिलेले नाहीत, त्यामुळे त्यांना एवढे मोठे विधेयक मंजूर करण्याचा नैतिक अधिकार नाही. दुसरा निषेध असा होता की हा कायदा फक्त हिंदूंसाठी का आणला जात आहे,

इतर धर्मातही बहुपत्नीत्वाची परंपरा आहे. हा कायदा सर्वांवर लागू झाला पाहिजे, म्हणजे समान नागरी आचारसंहिता अमलात आली पाहिजे. जनसंघासह काँग्रेसची हिंदू शाखा संसदेत विरोध करत असतानाच हरिहरनंद सरस्वती उर्फ कर्पात्री महाराज यांच्या नेतृत्वाखाली संसदेबाहेर मोठी निदर्शने सुरू होती.अखिल भारतीय राम राज्य परिषदेची स्थापना करणारे करपात्री म्हणाले की, हे विधेयक हिंदू धर्मातील हस्तक्षेप आहे. हे विधेयक हिंदू प्रथा, परंपरा आणि धर्मशास्त्राच्या विरोधात आहे. त्यांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना या विधेयकावर चर्चेचे खुले आव्हान दिले.कर्पात्री महाराजांसोबतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा आणि इतर हिंदू संघटना हिंदू कोड बिलाला विरोध करत होत्या. त्यामुळे हे विधेयक संसदेत चर्चेसाठी आणल्यावर देशभरात हिंदू संघटनांनी विरोध सुरू केला. आरएसएसने एकट्या दिल्लीत डझनभर निषेध रॅली काढल्या.नेहरूंनी विरोध केला तर त्यांचे प्रशासन पडेल अशी धमकी देऊनही विधेयकाची मांडणी पुढे ढकलण्यात आली.(The Wire newspaper Marathi dated 11/4/2018)

एकूणच स्त्री ही शूद्रातिशूद्र मानली जात होती.म. फुल्यांनी शूद्र-अतिशूद्र ही संकल्पना अस्पृश्य आणि इतर ब्राह्मणेतर मागास जातींचा समूह यांचा एकत्रित निर्देश करण्यासाठी जाणीवपूर्वक घडविली आहे. ती ब्राह्मणी जाती आणि वर्चस्वशाली जातींच्या विरोधातील शोषित जातिसमूहाची ऐतिहासिक (Historical Block) आघाडी म्हणून उपयोजिलेली आहे. यामधील स्त्री ही पुरुषांची मक्तेदारी बनली होती.यामध्ये स्त्रियांचाही वाटा होताच. धर्म सत्ता, सांस्कृतिक सत्ता, राजकीय सत्ता आणि सामाजिक सत्ता यांच्या अनुषंगाने विचार करता हिंदू कोड बील ही मक्तेदारी मोडू इच्छित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून अस्पृश्यता, जातिभेद हद्दपार करून स्वातंत्र्य, समता, बंधुताआधारित आधुनिक भारत व नवसमाजनिर्मितीचा पाया रचला.हा पाया मजबूत होण्यासाठी हिंदू कोड बील तेवढेच महत्त्वाचे होते. डॉ. आंबेडकरप्रणीत 'हिंदू कोडबिल' हे सामाजिक व धार्मिक सुधारणेला प्रगतिपथावर नेणारे होते.

'पाया बदला इमला बदलतो

इमला बदलल्याने बदलत नाही पाया

आणि टाळता येत नाही दुष्परिणाम कारणे बदला कर्म बदलतेही सारी विषमतेची मीमांसा आम्ही तुमच्याच क्रांतिपीठात शिकलो'

या काव्यपंक्ती प्रमाणे स्त्री ही पाया समजून नव्या समाजाची इमारत उभी करण्याचे स्वप्न डॉ. आंबेडकरांनी पहिले.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या डोळ्यांपुढील माणूस हा धर्मातीत स्वरूपाचा होता. माणसाची अस्मिता ही केवळ 'माणूसच' असावी, इतर अस्मिता या 'माणूस' या अस्मितांसमोरील महासंकट असावे. माणूस हेच सत्य आहे. माणसाची किंमत ही माणूसच आहे. माणूसच आपल्या जीवनाचा नायक आहे. अशा माणसाचा गौरव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाने जगात एक वेगळे मन्वंतर घडवून आणले. हे मन्वंतर म्हणजे आदर्श समाजाचा महाप्रकल्पच होय. इ.स. १९५० पासून आपण राष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेमध्ये आलो. गणराज्य, लोकशाही, समाजवादी, धर्मनिरपेक्ष राष्ट्र निर्माण झाले. भारताची मुख्य समस्या जातिधर्मावर आधारित समाजव्यवस्था, स्त्रियांचे दुय्यम स्थान ही आहे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते. म्हणून भारताला राष्ट्र बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये या महत्त्वाच्या अडसराला हद्दपार करणे गरजेचे आहे. तेव्हाच येथे नवीन सभ्यता निर्माण होऊ शकेल. ही नवी सभ्यता हिंदू कोड बिलाद्वारे त्यांना रुजवायची होती. भारतीय समाजाची उभारणी, पुनर्रचना समतेवर आधारित करावी, यासाठी सातत्याने लेखणी आणि वाणीचा विवेकनिष्ठेने त्यांनी वापर केला. समाजात एकत्वाची धारणा, सामुदायिक प्रेरणा, व्यापक कल्याणाची इच्छा, सार्वजनिक उद्दिष्टांबद्दल निष्ठा, परस्परतळमळ आणि सहकार्य असलेली समाजव्यवस्था त्यांना निर्माण करावयाची होती. समाजातील स्थितिशीलता जावी आणि समाजपरिवर्तन घडावे, हा ध्यास या विचारातून प्रकट होतो.

**निष्कर्ष**

१. हिंदू कोड बील स्त्रीवर्गाच्या सुधारणासाठी उचललेले एक महत्त्वाचे पाऊल ठरले.

२. हिंदू कोड बील जरी त्यावेळी पारित झाले नसले तरी नंतरच्या काळात विभाजित स्वरुपात का होईना ते मान्य झाले.

३. स्त्रियांना मालमत्तेत हक्क मिळण्यास मदत झाली.

४.घटस्फोट, बहुपत्नीविवाह , पालकत्व यावर निर्बंध आले.

५. विविध धर्म संघटनांनी या विधेयकास विरोध केला.

६. विविध धर्मांचा या विधेयकामध्ये समावेश केला गेला तर काही धर्मांना यामधून वगळले त्यामुळे मोठ्या प्रमाणात विरोध झाला.

७. स्वतःच्या उद्धारासाठी समस्त स्त्री वर्गाने या विधेयकास पाठिंबा द्यायला हवा होता तसा तो मिळाला नाही त्यामुळे हे बील मंजूर होऊ शकले नाही.

**संदर्भग्रंथ / संदर्भसाधने**

१.डॉ बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण वाड्मय खंड ३२ , डॉ. बाबसाहेब आंबेडकर प्रतिष्ठान, नवी दिल्ली,२०१९.

२. The Wire newspaper Marathi dated 11/4/2018.

३. हिंदू कोड बील खंड IV हिंदू संहिता विधेयक

४. Wikipedia.